सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर मंगळवार, ३१ मार्च २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## ▶▶ थोडक्यात...

### अ.भा.गुजराती समाज कार्यकारिणीवर मुकेश मेहता यांची निवड

**सोलापूर, दि.३० मार्च-**



अखिल भारत गुजराती समाजच्या कार्यकारिणीवर सोलापूर गुजराती मित्रमंडळाचे अध्यक्ष मुकेश मेहता यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र आणि गोवा राज्यासाठी अध्यक्ष म्हणून नागपूरचे मोहन पटेल यांची निवड करण्यात आली. गुजरातचे मुख्यमंत्री भुपेंद्रभाई पटेल हे या संस्थेचे मुख्य संवर्धक आहेत. या संस्थेच्या वतीने विविध संघटनात्मक आणि सामाजिक कार्य करण्यात येते.

### दुकानांमध्ये येऊन केली मारहाण

**सोलापूर, दि. ३० मार्च-**

नान्नज येथील कृषी दुकानांमध्ये दि. २८ मार्च रोजी प्रतीक महादेव गवळी, वय २५, नान्नज ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर ऋतिक महादेव गवळी, वय २७, नान्नज, ता. उत्तर सोलापूर यांनी सुरेश बाळासाहेब गवळी वय ३३, नान्नज यांचा चुलत भाऊ प्रतीक महादेव गवळी व ऋत्विक महादेव गवळी हे मोटरसायकल वरून येऊन आम्हाला का शिवीगाळ केली असे म्हणून त्यांनी सोबत आणलेल्या लाकडी काठीने डोक्यात हातावर पाठीवर व तोंडावर मारहाण करून धमकी दिली. याबाबत दोघांविरोधात सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात दि.२९ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे पुढील तपास शिंदे करत आहेत.

### परीक्षा देण्याकरिता गेला असता आयफोन चोरीला

**सोलापूर, दि. ३० मार्च-**

संभाजी शिंदे शाळेमध्ये दि.१८ फेब्रुवारी रोजी सोहन ज्ञानेश्वर माने, वय १८, रा. हत्तुर वस्ती, होटगी रोड, सोलापूर हा बारावीची परीक्षा देण्याकरिता गेले असता त्याच्या जवळील बॅगमध्ये पांढऱ्या रंगाचा एप्पल आईफोन कंपनीचा ५० हजार रुपयांचा मोबाईल ठेवला असता अज्ञात चोरट्याने चोरून नेला. याबाबत फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दि.२९ मार्च रोजी अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास परिट करत आहेत.



### कॅमेरा घेण्याकरिता विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि.३० मार्च-**

कॅमेरा घेण्याकरिता, फोटोग्राफीच्या व्यवसायाकरिता दि. २४ नोव्हेंबर २०२४ ते २८ मे २०२५ च्या दरम्यान विनोदकुमार पती, यंकमा सासू, संजूकुमार दीर, मनोजकुमार रा. मड्डी पेठ, वॉटर टँक शेजारी, रायचूर, कर्नाटक सर्वांनी मिळून माहेरून पैसे मागण्याच्या कारणावरून, जेवण बनवण्याच्या कारणावरून, घरातील कामे करण्याच्या कारणावरून, वेळोवेळी पूजा विनोदकुमार जुना, वय २६, रा. घर नंबर ४५, तुळशांती नगर, जुना विडी घरकुल, हैदराबाद रोड, सोलापूर यांना शिवीगाळ, हाताने मारहाण, दमदाटी करून त्रास देऊन त्यांना मानसिक व शारीरिक छळ केला. याबाबत दि. २९ मार्च रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात चौघां विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास कटके करत आहेत.

## सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये सुट्टीतही

# अधिकाऱ्यांचा ठिय्या; निधी खर्चासाठी शर्यत

### १ एप्रिलनंतर स्पष्ट होणार खर्च-अखर्चित निधीचे चित्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मार्च-**

मार्चअखेर जवळ आल्याने जिल्हा परिषदेतील कामकाजाला वेग आला असून शनिवार-रविवारीही अधिकारी व कर्मचारी कार्यालयात उपस्थित राहून निधी खर्चाच्या कामात गुंतलेले दिसून आले आहेत. शासनाकडून प्राप्त झालेला निधी वेळेत खर्च करून तो परत जाणार नाही, यासाठी प्रशासनाने जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभागप्रमुख विभागनिहाय निधीचा आढावा घेत आहेत. प्राप्त निधी आणि प्रत्यक्ष खर्च




यामधील तफावत कमी करण्यासाठी प्रत्येक विभागाला लक्ष्य देण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांना सकाळी ९ ते रात्री उशिरापर्यंत कार्यालयात थांबण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषदेला विविध योजनांअंतर्गत, जिल्हा नियोजन समिती, सेस फंड, १५वा वित्त आयोग

#### तांत्रिक अडचणी, कामांचा अभाव

काही विभागांतील प्रलंबित कामे, तांत्रिक अडचणी किंवा कामांचा अभाव यामुळे संबंधित निधी खर्च होण्यात अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे काही निधी परत जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः लघु पाटबंधारे विभागातील काही निधी राज्यस्तरावर वर्ग होऊ शकतो, अशी माहिती मिळत आहे.

तसेच तीर्थक्षेत्र विकास योजनेतून मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त झाला आहे. हा निधी शासनाच्या नियमांनुसार वेळेत खर्च करण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत.

ग्रामपंचायत विभागातील नागरी व जनसुविधा कामांसाठी सर्वाधिक निधी वितरित करण्यात आला आहे. दरम्यान, मंजूर योजनांपैकी काही निधी ३० मार्च रोजी जिल्हा परिषदेला प्राप्त होण्याची शक्यता असून १५व्या वित्त आयोगाचा निधीही जमा होण्याची अपेक्षा आहे. अतिवृष्टीमुळे विहिरींच्या नुकसानीसाठी दुसऱ्या टप्प्यातील ९३ लाख ९० हजार रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे.

पहिल्या टप्प्यातील निधी पूर्णतः खर्च केल्याशिवाय दुसऱ्या टप्प्यातील निधी वर्ग करू नये, अशा सूचना शासनाने दिल्या आहेत. तसेच दिव्यांग, समाजकल्याण, शिक्षण आणि आरोग्य विभागांतील शिल्लक निधी खर्च करण्यासाठीही विशेष हालचाली सुरु आहेत.

प्रत्येक विभागाकडून मागणी आणि प्रत्यक्ष प्राप्त निधी याची पडताळणी केली जात आहे. एकंदर, मार्चअखेरच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्रशासन 'निधी खर्चा'च्या शर्यतीत उतरले असून अखेरीस किती निधी खर्च झाला आणि किती परत गेला, याचे स्पष्ट चित्र १ एप्रिलनंतर समोर येणार आहे.

## डब्ल्यूआयटी जैन मंदिरात भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव भक्तिभावात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मार्च-**

जैन धर्मातील अहिंसा, सत्य, अपरिग्रह आणि करुणा या सार्वकालिक मूल्यांचा जागर करणारा भगवान महावीर स्वामी यांचा २६२५ वा जन्मकल्याणक महोत्सव वालचंद शिक्षण समूहातील डब्ल्यूआयटी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहातील जैन मंदिरात अत्यंत भक्तिभाव आणि उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यात्म, संस्कार आणि शिस्त यांचा सुंदर संगम अनुभवणारा हा सोहळा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

पहाटेपासूनच मंदिर परिसरात विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती पाहायला मिळाली. भगवान महावीरांच्या मूर्तीचे प्रक्षाल करून विधिवत पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मंत्रोच्चारांच्या मंगलध्वनीत केसरी पंचा व धोतर परिधान केलेल्या विद्यार्थ्यांनी साकारलेले वातावरण भक्तिरसाने भारलेले होते. मंदिर ध्वजारोहणानंतर पालखीमध्ये भगवानाची मूर्ती प्रतिष्ठापित करून भजन-कीर्तनाच्या तालावर पदयात्रा काढण्यात आली. संपूर्ण परिसर 'अहिंसा परमो धर्मः' या संदेशाने दुमदुमून गेला होता.

सकाळी ६.४० वाजता वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी यांनी माया गांधी यांच्या सह ध्वजारोहण करून महोत्सवाचे उद्घाटन केले. यावेळी विश्वस्त भूषण शहा, पृथ्वीराज गांधी, संगीता गांधी, वैभव गांधी, पराग शहा यांच्यासह प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर प्रभातफेरी व भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

यावेळी प.पू. १०८ धवलसागरजी महाराज यांनी वालचंद शिक्षण समूहाच्या उत्तरोत्तर प्रगतीसाठी आशीर्वाद दिला, तर प.पू. १०८ मंथनसागरजी महाराज यांचेही सानिध्य लाभले. मुनिश्रींनी विद्यार्थ्यांना नियमित मंदिरात येऊन अभिषेक व साधना करण्याचे मार्गदर्शन केले.

## सोलापूर विद्यापीठाच्या २ ते ९ एप्रिलच्या परीक्षा पुढे ढकलल्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या माहे मार्च-एप्रिल २०२६च्या पदवी अभ्यासक्रमाच्या भाग तीनच्या परीक्षा २ एप्रिलपासून सुरू होणार होत्या. परंतु महाराष्ट्र शासनाची स्टेट कॉमन एन्टरन्स टेस्ट एलएलबी भाग ३, बीपीएड, एमबीए, बीएड व एम एड (तीन वर्षाच्या इंटिग्रेटेड) अभ्यासक्रमाच्या प्रवेशपूर्व परीक्षा २ ते ९ एप्रिल दरम्यान होणार आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या २ ते ९ एप्रिलच्या पाच पदवी अभ्यासक्रमाच्या भाग ३ सत्र ५ व ६च्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे यांनी कळविले आहे.

**परीक्षा पुढे ढकलण्यात आलेले अभ्यासक्रम :** बीए, बीकॉम, बीएससी सर्व अभ्यासक्रम, बीसीए, बीबीए.

## 'झेडपी'च्या विषय समिती सदस्यांची निवड १० एप्रिलला

### नव्या पदाधिकाऱ्यांची पहिली मोठी परीक्षा

### एप्रिल अखेर पहिल्या सर्वसाधारण सभेची शक्यता



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मार्च-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या नव्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीनंतर आता कारभाराला गती देण्यासाठी हालचाली सुरू झाल्या असून, पहिली सर्वसाधारण सभा २२ ते २५ एप्रिलदरम्यान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यापूर्वी १० किंवा १२ एप्रिल रोजी पाचही विषय समित्यांच्या सदस्यांची निवड केली जाणार आहे.

दि.१८ मार्च रोजी जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्षपदांची निवड पार पडली होती. त्यानंतर विविध विषय समित्यांच्या सभापतींची निवडही पूर्ण झाली आहे. आता पुढील टप्प्यात या समित्यांच्या सदस्य रचनेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. समित्यांचे सदस्य निश्चित झाल्यानंतरच जिल्हा परिषदेचे नियमित कामकाज पूर्ण क्षमतेने सुरू होणार आहे.

नियमानुसार, विषय समित्यांच्या सदस्यांची निवड झाल्यानंतर १२ दिवसांच्या आत सर्वसाधारण सभा घेणे बंधनकारक असते. त्यामुळे १० एप्रिलनंतरचा कालावधी विचारात घेतल्यास २२ ते २५ एप्रिल दरम्यान पहिली सभा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या पहिल्या सर्वसाधारण सभेला विशेष महत्त्व आहे. या बैठकीत विविध विभागांच्या कामांचा आढावा, प्रलंबित विकासकामांवर चर्चा तसेच आगामी धोरणात्मक निर्णय घेतले जाण्याची अपेक्षा आहे. नव्याने निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांसाठी ही सभा दिशादर्शक ठरणार असून, जिल्हा परिषदेच्या पुढील कामकाजाचा रोडमॅप याच बैठकीत ठरेल.

## कर्जदार शेतकऱ्यांना दिलासा; दोन लाखांपर्यंत कर्जमाफीचा मार्ग मोकळा

### पीककर्जापुरती मर्यादा नाही; मध्यम व दीर्घ मुदतीच्या कर्जाच्याही समावेशाची शक्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मार्च-**

राज्यातील थकबाकीदार शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणाऱ्या कर्जमाफी योजनेची अंमलबजावणी आता वेगाने सुरू झाली असून, ३० जूनपूर्वी पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी मिळण्याची शक्यता आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात जाहीर झालेल्या या निर्णयानंतर सहकार विभागाने राज्यभरातील थकबाकीदार शेतकऱ्यांची सविस्तर आकडेवारी तयार केली आहे.

या कर्जमाफीबाबत सुरुवातीला केवळ पीककर्जालाच माफी लागू होणार का, असा संभ्रम होता. मात्र, सहकार विभागातील वरिष्ठ सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकबाकीत असलेल्या कर्जांमध्ये पीककर्जासोबतच मध्यम व दीर्घ मुदतीच्या कर्जाचाही समावेश असणार आहे. त्यामुळे केवळ पीककर्जापुरती ही माफी मर्यादित राहणार नसून, विविध प्रकारच्या शेतीसंबंधित कर्जांचा यात समावेश होणार असल्याची माहिती सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून सांगण्यात

- ❋ थकीत कर्जाची स्थिती (राज्यभर)
- ❋ एकूण शेतकरी : १,३३,४४,२०९
- ❋ थकबाकीदार शेतकरी : २४,७३,५६६
- ❋ एकूण थकबाकी : ३५,४७७ कोटी रुपये
- ❋ प्रस्तावित कर्जमाफी : प्रत्येकी २ लाख रुपये

आली. राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या अहवालानुसार, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत राज्यातील तब्बल २४ लाख ७३ हजार ५६६ शेतकरी थकबाकीदार आहेत. या शेतकऱ्यांकडे एकूण ३५ हजार ४७७ कोटी रुपयांची थकबाकी आहे. या थकबाकीत पीककर्जाबरोबरच मध्यम व दीर्घ मुदतीच्या कर्जांचा मोठा वाटा आहे. विशेष म्हणजे, अनेक शेतकऱ्यांचे पीककर्ज नियमित असले तरी इतर मुदतीची कर्जे थकीत असल्याचे चित्र समोर आले आहे. सहकार विभागाने जिल्हा मध्यवर्ती बँका, राष्ट्रीयीकृत बँका तसेच इतर वित्तीय संस्थांकडील थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती संकलित केली आहे. या आकडेवारीच्या आधारे पात्र शेतकऱ्यांची यादी निश्चित केली जात असून, त्यानुसार कर्जमाफीची अंमलबजावणी केली जाणार आहे.

शेतकऱ्यांकडील पीककर्जाच्या परतफेडीची अंतिम मुदत ३० जूनपर्यंत असते. त्यामुळे शासनाने जाहीर केलेली दोन लाख रुपयांची कर्जमाफी शेतकऱ्यांना या कालावधीतच मिळेल, यासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरू आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आशावाद निर्माण झाला आहे. एकूणच, राज्य सरकारच्या या निर्णयामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

#### या शेतकऱ्यांना मिळणार दिलासा

राज्यातील सोलापूर, पुणे, नाशिक, परभणी, धाराशिव, नांदेड, नागपूर, मुंबई, जालना, बुलढाणा, बीड, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये थकबाकीचे प्रमाण अधिक असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना कर्जमाफीचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. कर्जमाफीच्या अंमलबजावणीसाठी प्रशासनाने तयारी पूर्ण केली असून, निकषांनुसार पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांना थेट लाभ देण्यावर भर दिला जात आहे. या निर्णयामुळे शेती क्षेत्राला नवसंजीवनी मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## शांती चौकातील स्मशानभूमी प्रकरणात आ.विजयकुमार देशमुख, आ.सुभाष देशमुख एकत्र

### होटगी संस्थेस जागा न दिल्यास कोर्टात जाणार

### महापालिकेच्या अधिकाऱ्यांवर केले गंभीर आरोप



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मार्च-**

शांती चौक येथील दोन एकर जागा लिंगायत स्मशानभूमीसाठी होटगी संस्था की सिध्देश्वर देवस्थान यापैकी नेमकं कोणत्या संस्थेला द्यायची? यावरुन महापालिकेत सत्ताधारी पक्षातच वाद उफाळून आला आहे. सोमवारी झालेल्या घडामोडींमुळे हा वाद चव्हाट्यावर आला. याप्रश्नी आ.विजयकुमार देशमुख आणि आ.सुभाष देशमुख हे दोघे महापालिकेत एकत्रित येवून आयुक्त यांच्यासह अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले. दरम्यान, स्मशानभूमीची ही जागा होटगी संस्थेस न दिल्यास कोर्टात जाणार असल्याचा इशारा देण्यात आला.

लिंगायत स्मशानभूमीसाठी संबंधित जागा सिध्देश्वर देवस्थान यांना देण्याचा ठराव महापालिकेच्या सभेत मंजूर झाला होता. मात्र हा ठराव चुकीचा असून प्रशासनातील काही अधिकाऱ्यांनी राजकारण करत आपले पत्र लपवून ठेवले, असा आरोप आ.विजयकुमार देशमुख यांनी आयुक्तांसमोर केला. उपायुक्त आशिष लोकरे यांना तुम्ही राजकारण करत आहात का? असा थेट सवाल करण्यात आला. शांती चौक येथील जागा सिध्देश्वर देवस्थान यांना देण्यास आमदार विजयकुमार देशमुख यांच्या समर्थक नगरसेवकांनी विरोध दर्शवला होता. त्यांच्या गटाकडून ही जागा होटगी येथील बृहन्मठ संस्थेला देण्याची मागणी करण्यात आली होती.

आमदार विजयकुमार देशमुख यांनी ७ जुलै २०२५ रोजी आयुक्तांना याबाबत पत्र दिले होते. ३० जुलै २०२५ रोजी पुन्हा स्मशानभूमीची जागा होटगी संस्थेला देण्याची स्पष्ट मागणी करणारे पत्र दिले. मात्र हे पत्र आयुक्तांपर्यंत पोहोचू दिले नाही, ही बाब उघडकीस येताच आ.विजयकुमार देशमुख, आ.सुभाष देशमुख यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. यावर आयुक्तांनी तुमचे पत्र माझ्यापर्यंत आलेच नाही असे स्पष्ट केले. या उत्तरानंतर आमदार देशमुख अधिक संतप्त झाले.

चुकीचे वर्तन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी करत, गरज पडल्यास हे प्रकरण मुख्यमंत्र्यांपर्यंत नेऊ, असा इशाराही दोन्ही आमदार देशमुखांनी दिला. येथील अधिकारी लिंगायत समाजामध्ये भांडण लावत आहेत असा आरोपही त्यांनी केला. श्री सिध्देश्वर देवस्थाने स्मशानभूमीची जागा मागितलीच नसताना महापालिका अधिकाऱ्यावर असा कोणाचा दबाव होता की त्यांनी स्वतः जाऊन सिध्देश्वर देवस्थानशी संपर्क केला. याउलट आम्ही ही जागा होटगी संस्थेला द्यावी अशी मागणी केली होती, असेही सांगण्यात आले. यावेळी शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे, काँग्रेसचे गटनेते चेतन नरोटे हेही उपस्थित होते.

#### पुढील सभेत पुन्हा ठराव करण्याचा प्रस्ताव

महापालिका आयुक्तांची भेट घेतल्यानंतर दोन्ही आमदार देशमुख आणि त्यांच्या समर्थक नगरसेवकांसह विरोधी पक्षाने पुढील सभेमध्ये घेऊ, असा ठराव करण्यात आला. यावर आयुक्तांनी अभिप्राय दिला की नाही दिला तर कोर्टात जाण्याचा इशारा दिला.

#### म्हातारी मेल्याचे दुःख नाही काळ सोकावता कामा नये

माझे पत्र आयुक्तांना दिले जात नाही. याउलट जे नगरसेवक नव्हते त्यांचे खोटे पत्र आयुक्तांपुढे सादर करुन तो प्रस्ताव मंजूर करण्यात आला. म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावता कामा नये, असे आ.विजयकुमार देशमुख यांनी सांगितले.

#### दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे

आमदार विजय देशमुख यांचे पत्र दडपले जाते हा प्रकार गंभीर आहे. या प्रकरणाची सकल चौकशी करावी आणि दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. तरच यापुढील काळात प्रशासन व्यवस्थित चालेल अन्यथा असे प्रकार कायमच घडत राहतील, असे आमदार सुभाष देशमुख म्हणाले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३९८

**नातरी बालक बोबडां बोलीं । कां वांकुडां विचुकां पाउलीं ।**
**तें चोज करुनि माऊली । रिझे जेवीं ।।**

माऊलींनी आत्तापर्यन्त अर्जुनविषादयोग, सांख्ययोग, कर्मयोग, ज्ञानसंन्यासयोग, योगगर्भयोग, आत्मसंयमयोग, ज्ञानविज्ञानयोग आणि ब्रम्हाक्षरनिर्देशयोगाचे स्पष्टीकरण केले आहे. आता राजविदयाराजगुहययोगास प्रारंभ केला आहे. हा प्रारंभ करतांना माऊलीनी आत्मविश्वासाचे एक उत्तुंग शिखरच गाठले आहे श्रोत्यांनी हे गीताख्य केवळ एकाग्र मनाने लक्ष देऊन ऐकले तर सर्व सुखाचे अधिकारपत्र त्यांना मिळेल. हे



आपण उघडपणे प्रतिज्ञापुर्वक सांगत असल्याचे माऊली म्हणतात. आत्मविश्वासपूर्वक आणि प्रतिज्ञेवर सांगणारे हे पहिलेच संत असावेत. माऊली असेही म्हणतात की तुम्ही एकाग्रतेने लक्ष दया. असे मी गर्वाने, आढयतेने म्हणत नाही तर ही माझी लडीवाळपणाची विनंती आहे. कारण आपण सर्व श्रोते ऐश्वर्यसंपन्नतेची माहेरघरे आहात, त्यामुळे लाडांचे लाड पुर्ण होतील तसेच माझे मनोदयांचे संकल्प सिध्दीस जातील. कृपाळू श्रोत्यांच्या दृष्टीच्या खोलीत प्रसन्नतेचे मळे बहरुन आले आहेत. त्या प्रसन्नतेची सावली पाहून थकलेला मी तेथे लोळत आहे. एवढयावरच माऊली थांबत नाहीत. तर ते असेही अधिकाराने म्हणतात, अहो श्रोते हो, तुम्ही सुखामृत्ताचे डोह आहात, म्हणूनच मी स्वत:ला हवेतसे या डोहात डूंबू इच्छितो आणि येथेच जर मी सलगी करण्यात भ्यालो तर कोठे शांत होऊ बरे ?

श्रोत्याबद्यलचे मोठेपण, श्रोत्यांचा आपल्यावरील अधिकार आणि आपला श्रोत्यावरील अधिकार, त्यांच्याशी जोडावयाचे नाते, त्यांच्याबरोबर निर्माण करावयाचा लडिवाळपणा, त्यांची मान मर्यादा, या सर्व बाबी माऊलींनी, आधी केले मग सांगीतले । या संतोक्ती प्रमाणे करुन दाखविल्या आहेत. श्रोत्याबरोबर लडिवाळपणा करतांना आणि आपले व श्रोत्यांचे नाते किती प्रेमळ आहे हे सांगतांना माऊली म्हणतात, नातरी बालक बोबडां बोलीं । कां वांकुडां विचुकां पाउलीं । तें चोज करुनि माऊली । रिझे जेवीं ।। प्रेम, विश्वास, अधिकार, ममता दाखवायची म्हटले की माऊली स्त्रीचा दृष्टांत घेतच असतात. श्रोत्याशी आपले नाते कसे आहे हे सांगतांना माऊलींनी श्रोत्यांच्या हदयालाच हात घातला आहे. लहान बालक ज्याप्रमाणे, बोबडया शब्दांनी किंवा वाकडया अडखळणा-या पावलांनी चालून, गंमत करुन आईला रमविते. विशेष म्हणजे त्या बालकाच्या आईला सर्व ज्ञात असतांनासुध्दा ती रमते. अगदी तसेच तुम्हा श्रोत्यांना सर्व माहिती असतांना सुध्दा मी लहान बालकांप्रमाणे तुम्हाला आई समजून रमवित आहे. तुम्हा संत जनाचे प्रेम आमच्यावर व्हावे या उत्कट इच्छेने आम्ही तुमच्याशी सलगी करीत आहोत, असेही माऊली म्हणतात. माऊलीच्या या लडिवाळपणामुळे, नम्रतेमुळेच की काय, आज शेकडो वर्ष संपली असतांनासुध्दा लाखों भाविकांनी माऊलीच्या ज्ञानेश्वरीला आपल्या हदयात अखंड स्थान दिले आहे. अनेक वेळा ज्ञानेश्वरी वाचली तरीही ती पुन्हा पुन्हा वाचतच राहावी वाटते. हे माऊलीच्या प्रेमाचे, नम्रतेचे,विद्वत्तेचे द्योतकच आहे. आतापर्यन्तच्या ओव्यातून माऊलीच्या लडिवाळपणाचा, नम्रतेचा अनुभव आपणालाही आलाच असेल. असा लडिवाळपणा आपल्यात असेल तर आनंदच आनंद असणार आहे यात शंका नाही. **जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : मंगळवार,
दि. ३१ मार्च २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - फाल्गुन शु. द्वादशी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- पू.फाल्गुनी (१५.२०)
योग - गंड (१५.४१)
करण - गरज (१८.५८)
राहू काल : मंगळवार
स. ७.३० ते ९.००

दिनविशेष :
भगवान महावीर जन्म कल्याणक..
१९९७: भारतीय शास्त्रज्ञ डॉ. जयंत विष्णू नारळीकर यांना युनेस्कोतर्फे 'कलिंग पुरस्कार' प्रदान करण्यात आला.
२००१: सचिन तेंडुलकरने एकदिवसीय सामन्यात १०,००० धावा पूर्ण करण्याचा विक्रम केला...
१९६४: मुंबईतील विजेवर चालणाऱ्या ट्रॅम बंद झाल्या.

## राज्यस्तरीय गौरवाने वाढली जबाबदारी : मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करत सोलापूर जिल्हा परिषदेने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांना ''उत्कृष्ट कार्यालय प्रमुख'' म्हणून प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या पुरस्काररुपी गौरवाने जबाबदारी वाढली आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सांगितले.

सोलापूर जिल्हा परिषदेने विविध निकषांवर १०० पैकी ८० गुण मिळवत राज्यात अव्वल स्थान मिळवले. प्रशासनातील पारदर्शकता, शिस्तबद्धता आणि कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणावर दिलेला भर यामुळे ही कामगिरी शक्य झाली आहे. ग्रामविकास विभागांतर्गत राबविण्यात आलेल्या या कार्यक्रमाचा उद्देश स्थानिक स्वराज्य संस्थांतील कर्मचाऱ्यांचे कार्यमूल्यांकन करणे हा होता. या स्पर्धात्मक प्रक्रियेत सोलापूर जिल्हा परिषद इतर सर्व जिल्ह्यांवर मात करत राज्यात पहिल्या क्रमांकावर पोहोचली.

गुणांकन अहवालातील ठळक बाबी याप्रमाणे; ज्येष्ठता सूची : सर्व ५७ संवर्गांची अद्ययावत यादी (१०/१० गुण) पदोन्नती नियुक्ती : ९५९ पैकी ८२० पदे कार्यरत (१०/१० गुण) सरळसेवा नियुक्ती : १३,००७ पैकी ११,४२५ पदे भरलेली (१०/१० गुण) बिंदुनामावली प्रमाणीकरण : ५७ पैकी ५५ संवर्ग प्रमाणित (१०/१० गुण) अनुकंपा नियुक्ती : १६८ पदांवर सर्व नियुक्त्या पूर्ण (१०/१० गुण) आय.जी. ओ.टी.प्रशिक्षण : ९५% कर्मचाऱ्यांनी ५ कोर्स पूर्ण (१०/१० गुण)सेवापुस्तक अद्ययावत : ९९.२७% नोंदी पूर्ण (२०/२० गुण)


# उन्हामुळे अंगणवाड्यांच्या वेळेत बदल; ३१ मे पर्यंत सकाळीच कामकाज

### आदेशानंतर आठ दिवसांनी अंमलबजावणी; बालकांच्या आरोग्यासाठी निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

जिल्ह्यात वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे लहान बालकांच्या आरोग्यावर होणारा परिणाम लक्षात घेऊन जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. ग्रामीण भागातील सर्व अंगणवाडी केंद्रांच्या कामकाजाच्या वेळेत तात्पुरता बदल करण्यात आला असून, हा बदल ३१ मेपर्यंत लागू राहणार आहे.

या संदर्भातील आदेश १९ मार्च रोजी जारी करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीला आठ दिवसांचा विलंब झाला असून, सुधारित वेळापत्रकाची अंमलबजावणी शुक्रवारपासून सुरू करण्यात आली आहे. उन्हाच्या पार्श्वभूमीवर सकाळच्या वेळेतच कामकाज आटोपण्याचा निर्णय घेतल्याने बालकांना उष्णतेपासून संरक्षण मिळणार आहे.नवीन वेळापत्रकानुसार अंगणवाडी केंद्रे सकाळी ७.१५ वाजता सुरू होऊन दुपारी १.१५ वाजेपर्यंत चालणार आहेत. सकाळी ७.१५ ते ७.३० या वेळेत केंद्र उघडणे व पूर्वतयारी केली जाणार आहे. त्यानंतर ७.३० ते ८ या वेळेत पूर्वशालेय शिक्षण दिले जाईल. सकाळी ८ ते ८.१५ या कालावधीत लाभार्थ्यांना नाश्ता वाटप होईल. ८.१५ ते १० या वेळेत पुन्हा शिक्षण सत्र घेण्यात येणार आहे. यानंतर १० ते १०.३० या वेळेत लाभार्थ्यांना गरम व ताजा आहार दिला जाणार आहे. १०.३० ते ११.१५ या कालावधीत नोंदवही लेखन तसेच पोषण ट्रॅकर अद्ययावत करण्याचे काम केले जाईल. ११.१५ ते ११.४५ या वेळेत विविध संदर्भ सेवा पुरवण्यात येणार आहेत. दुपारी ११.४५ ते



१.१५ या वेळेत अंगणवाडी सेविका गरोदर महिला, स्तनदा माता व कुपोषित बालकांच्या घरी भेट देऊन आहार व आरोग्य विषयक मार्गदर्शन, समुपदेशन तसेच विविध उपक्रम राबवणार आहेत. या माध्यमातून लाभार्थ्यांपर्यंत सेवा थेट पोहोचवण्यावर भर दिला जाणार आहे.

दरम्यान, हा बदल केवळ उन्हाळ्यापुरता मर्यादित असून १ जूनपासून पूर्वीचे नियमित वेळापत्रक पुन्हा सुरू करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे बालकांचे आरोग्य सुरक्षित राहण्यास मदत होईल, अशी अपेक्षा प्रशासनाने व्यक्त केली आहे.



## हिंगुलांबिका प्राथमिक शाळेचे चित्रकला स्पर्धेत यश

**सोलापूर, दि. ३० मार्च-**

साखर पेठ येथील बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हिंगुलांबिका प्राथमिक शाळेने चित्रकला स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे. सोलापूर जिल्हा कलाध्यापक संघ, सोलापूर आयोजित विविध गटातील चित्रकला स्पर्धेमध्ये आयुष दीपक दंतकाळे तिसऱ्या गटात प्रथम क्रमांक, श्रेया दीपक हंचाटे दुसऱ्या गटात द्वितीय क्रमांक, जीविका दीपक चामनळी दुसऱ्या गटात तृतीय, व समृद्धी लखन जानकर तिसऱ्या गटात तृतीय क्रमांक पटकाविले आहे. या विद्यार्थ्यांना रेवती क्षीरसागर यांचे मार्गदर्शन लाभले. त्याबद्दल बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री बापू ढगे, सचिव श्री विजय पुकाळे यांनी अभिनंदन केले. याप्रसंगी मुख्याध्यापक श्री प्रमोद हंचाटे, सहशिक्षिका सौ माधवी खमितकर विद्यानिकेतन प्रशालेचे ग्रंथालय प्रमुख श्रीधर महिंद्रकर, माजी लिपिक श्री सतीश हंचाटे यांची उपस्थिती होती.

## मुलाच्या खूनाप्रकरणी वडिलाला १ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी


**टेंभुर्णी, दि. ३० मार्च-**

रुई (ता. माढा) येथील तरुणाच्या खूनप्रकरणी अटक करण्यात आलेल्या वडिलाला न्यायालयाने दि.१ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणातील संशयित आरोपी राजेंद्र भानुदास पतंगे (वय ६०, रा. रुई, ता. माढा) याला दि. २९ मार्च रोजी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी अनय कुलकर्णी यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी तपास अधिकारी सहायक पोलीस अधीक्षक राहुल आत्राम यांनी गुन्ह्याच्या तपासाबाबत न्यायालयात माहिती देत पुढील तपासासाठी पोलीस कोठडीची मागणी केली. न्यायालयाने ती मंजूर करत आरोपीला १ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. आरोपीच्या वतीने ॲड. अजिंक्य संगीतराव यांनी बाजू मांडली. याबाबत सविस्तर माहिती अशी की, दि. २८ मार्च रोजी सकाळी सुमारे ७.४५ वाजता रुई येथील पोलीस पाटील यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्याशी संपर्क साधून विश्वजित ऊर्फ पिलो राजेंद्र पतंगे (वय २५) हा त्याच्या राहत्या घरी मृत अवस्थेत आढळल्याची माहिती दिली होती. झोपेत असतानाच त्याच्यावर हल्ला झाल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. टेंभुर्णी पोलिसांच्या तपासात काही दिवसांपूर्वी मृत विश्वजितने आपल्या वडिलांना मारहाण केली होती. तसेच दि. २७ मार्च रोजी शेतातील पाणी देण्याच्या कारणावरून दोघांत वाद व शिवीगाळ झाली होती. या वादातून संतापलेल्या वडिलाने रात्री सुमारे ११.३० वाजता मुलावर झोपेत असताना म्हशीच्या लोखंडी मेकने डोक्यावर व तोंडावर वार करून खून केल्याचे समोर आले

## अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

### महापुरुषांच्या भेटीने नव्हे, तर त्यांच्या आज्ञापालनानेच कल्याण



भगवान किंवा गुरुंच्या केवळ भेटीमुळे मानवाचे कल्याण होत नाही. मानवाचे कल्याण महापुरुषांना भेटण्याने नाही, तर त्यांनी दिलेल्या आज्ञांचे पालन केल्याने आणि त्यांचे विचार आचरणात आणल्याने होते, असे प्रतिपादन १०८ विद्यासागरजी महाराज यांचे सुशिष्य मुनीश्री वीरसागरजी महाराज यांनी केले. बाळीवेस येथील श्री दिगंबर जैन बोर्डिंगमध्ये आयोजित मंगल प्रवचनात ते श्रावकांना मार्गदर्शन करत होते. मुनीश्री पुढे म्हणाले की, जे आपल्यापेक्षा मोठे आहेत, पूज्य आहेत किंवा गुरु आहेत, त्यांच्या शब्दाचे कधीही उल्लंघन करू नका. स्वतःचा अहंकार मध्ये न आणता त्यांच्या मार्गदर्शनाचा स्वीकार करा. जो गुरुंची आज्ञा मानत नाही, तो अहंकारी असतो. केवळ ऐकण्यापुरते मर्यादित न राहता, जे ऐकले आहे ते जीवनात अंगीकारणारा श्रोता खऱ्या अर्थाने श्रेष्ठ असतो.

प्रवचनादरम्यान मुनीश्रींनी खाण्यापिण्यातील शुद्धतेवर विशेष भर दिला. ते म्हणाले, फास्ट फूड, आईस्क्रीम, ब्रेड, बिस्किटे आणि चॉकलेट्समध्ये मांसाहाराचे अंश असू शकतात, त्यामुळे अशा पदार्थांचा त्याग करा. आजारपणात डॉक्टरांनी औषध जरी सुचवले, तरी मांसाहारी घटकांपासून बनलेल्या औषधांचे सेवन करू नका. प्रसंगी मृत्यू स्वीकारलेला बरा, पण नियम तोडू नका. चहा, कॉफी आणि मद्यपानासारख्या सवयी कायमच्या बंद करा. जीवनात एखादा तरी ठोस नियम किंवा संकल्प करा. मन, वचन आणि कर्माने कोणत्याही परिस्थितीत मांसाहार करणार नाही, असा निश्चय करा. तुमच्या याच संकल्पातून जीवनाचे कल्याण होईल आणि तुमचे संपूर्ण जीवन बदलून जाईल, असेही त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी उपस्थितांना दररोज प्रभू चरणांचे दर्शन घेण्याचा आणि घरात भगवान प्रतिमेची स्थापना करण्याचाही नियम घेण्यास प्रवृत्त केले.



## आलेगावच्या मोहिनी पाटीलला कडलासच्या 'आपुलकी'ची मदत

**सांगोला, दि. ३० मार्च-**

पाटील वस्ती, आलेगाव (ता.सांगोला) येथील इ.१० वी मध्ये शिकत असलेली मोहिनी दत्तात्रय पाटील हिला सर्प दंश झाला होता. त्यामुळे ती बेशुद्ध अवस्थेत पडली होती. घरची परिस्थिती नाजूक असल्यामुळे त्यांनी समाजाला आर्थिक मदत देण्याचे आवाहन केले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद देत आपुलकी मित्र मंडळ, कडलास (ता.सांगोला) या संस्थेमार्फत अध्यक्ष प्रा. डॉ. बबन गायकवाड व उपाध्यक्ष विश्वनाथ शिंदे यांनी तिच्या घरी जाऊन २ हजार ५०० रु.ची मदत केली.

## माता त्रिशलादेवी पुरस्काराने २१ कर्तृत्ववान मातांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

भगवान महावीर २५५२ जन्म कल्याणक महोत्सवाचे औचित्य साधत आस्था फाउंडेशन, सोलापूर संचालित आस्था रोटी बँक यांच्या वतीने 'माता त्रिशलादेवी पुरस्कार' या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत धार्मिक, सामाजिक व सेवाभावी क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या २१ कर्तृत्ववान मातांचा गौरव करण्यात येणार आहे.

समाजात निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान व्हावा, तसेच त्यांच्या प्रेरणादायी कार्यातून नव्या पिढीला दिशा मिळावी, या उदात्त हेतूने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती आस्था फाउंडेशनचे विजयकुमार छंचुरे यांनी दिली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सरकारी वकील प्रदीप सिंग राजपूत, सिव्हिल हॉस्पिटलचे ऋत्विक जयकार, ॲड. नीता मकणी, ॲड. साधना सांगवी, श्याम पाटील, राजू हौशेट्टी उपस्थित होते. प्रथमता प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते भगवान महावीर प्रतिमेस पूजन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यावेळी नमोकार महामंत्र जाप म्हणण्यात आले. पुरस्कार विजेत्यांना ट्रॉफी सर्टिफिकेट मोत्याचे माळ गुलाबाचे फुल देऊन सत्कार करण्यात आले. कार्यक्रमासाठी आस्था रोटी बँकेचे सदस्य सोलापूर जिल्हा महिला अध्यक्ष नीलिमा हिरेमठ, उपाध्यक्ष छाया गंगणे, विद्या सिंघम, महिला शहर अध्यक्ष वनकुद्रे, उपाध्यक्ष मंगल पांढरे, युवा अध्यक्ष पुष्कर पुकाळे, युवा उपाध्यक्ष सत्यम सोलापूरकर, विनोद भोसले, अविनाश माचरला, स्नेहा मेहता, जोशना सोलापूरकर, संगीता छंचुरे, निसर्ग छंचुरे, दत्तात्रय दळवी, नरेश रेस, अंबादास जोशना, आस्था रोटी बँकेचे संस्थापक विजय छंचुरे उपस्थित होते सूत्रसंचालन सुवर्णा कटारे तर प्रस्तावना छाया गंगणे केले.



**या मातांचा झाला गौरव**

प्रिया पाटील, सारिका कासार, प्रांजली मोहीकर, प्रवीणा सोलंकी, डॉ. सारिका मेहता, पिंकी जैन, सुरेखा गडदे, श्रद्धा शहा, आशा पाटील, अमिता कटके, सीमा भंडारी, दर्शना थाळवे, ज्योती मिराखोर, विजया रणदिवे, दर्शना उपाध्ये, रूपाली भस्मे, शशिकला पांढरे, कविता भस्मे, सोनाली पालिया, शोभा कळसकर, सरोजनी कस्तुर.


# अस्थिर जगात महावीरांचे मूल्याधिष्ठित मार्गदर्शन

**सध्याच्या युद्धजन्य व अशांत परिस्थितीत महावीरांचे विचार मानवतेसाठी आशेचा किरण ठरतात. अहिंसा, अनेकांतवाद, अपरिग्रह आणि संयम या तत्त्वांचा स्वीकार केल्यास जगात शांतता, सौहार्द आणि सहअस्तित्व निर्माण होऊ शकते. त्यामुळे आजच्या काळात महावीरांच्या शिकवणींचा स्वीकार करणे हीच खरी मानवतेची गरज आहे.**

---------------------------------

सतत युद्ध, भ्रष्टाचार, नैराश्य, महिलेवरील अत्याचाराच्या बातम्या वाचत असताना प्रसारमाध्यमे पहावी की पाहू नये, असे विचार मनात येणे स्वाभाविक आहे. अनेक ठिकाणी युद्ध, संघर्ष, हिंसा आणि द्वेषाचे वातावरण निर्माण झालेले दिसते. राष्ट्र-राष्ट्रांमधील संघर्ष, दहशतवाद, सीमावाद आणि सत्तास्पर्धा यामुळे मानवतेसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. अशा अस्थिर आणि तणावपूर्ण परिस्थितीत वीर, अतिवीर, महावीर, सन्मती, वर्धमान ही पाचही नावे सार्थक करणारे जैन धर्माचे चोवीसावे तीर्थंकर भगवान महावीर यांचे विचार अत्यंत प्रासंगिक ठरतात.

महावीरांचे अहिंसा, सत्य, अस्तेय (चोरी न करणे), अपरिग्रह व ब्रह्मचर्य रूपी पंचमहाव्रती विचार तारक आहे. त्यांची 'जगा आणि जगू द्या' म्हणत जगाला दिलेली अहिंसेची शिकवण आजच्या काळात सर्वात महत्त्वाची आहे. युद्धामुळे निरपराध लोकांचे प्राण जातात, जीव व वित्त हानी होते, समाज उद्ध्वस्त होतो आणि मानवतेचा नाश होण्याची शक्यता असते. जर प्रत्येक राष्ट्रांनी अहिंसेचा मार्ग स्वीकारला, तर संवाद, शांतता आणि सहजीवन यांना प्राधान्य मिळेल. अहिंसा म्हणजे केवळ शारीरिक हिंसा टाळणे नव्हे, तर मनातही द्वेष न ठेवणे होय. त्यामुळे जागतिक शांततेसाठी ही संकल्पना अत्यंत आवश्यक आहे. युद्धाचे मूळ कारण म्हणजे 'माझेच मत बरोबर' ही प्रत्येकाची हटवादी वृत्ती आहे. अशा परिस्थितीत महावीरांचा अनेकांतवाद (सत्याचे अनेक पैलू असतात) हा विचारही आज अत्यंत महत्त्वाचा आहे. अनेकांतवाद प्रत्येक गोष्टीकडे विविध दृष्टिकोनातून पाहण्यास शिकवतो. त्यामुळे संघर्ष टाळून सहिष्णुता, संवाद आणि समजूतदारपणा वाढतो.



आजच्या आधुनिक युगात माणसाकडे सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध आहेत-मोबाइल, इंटरनेट, आलिशान घरे, वाहने, मनोरंजनाची साधने इत्यादी. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जीवन अधिक सोयीस्कर आणि आरामदायी झाले आहे. तरीही एक प्रश्न सतत उपस्थित होतो की, एवढ्या सुविधा असूनही माणसाची समाधानाची भावना का कमी होत चालली आहे? याचे मुख्य कारण म्हणजे वाढती अपेक्षा आणि स्पर्धा. आज आपण सतत इतरांशी तुलना करत असतो. सोशल मीडियामुळे इतरांचे यश, वैभव आणि आनंद पाहून स्वतःच्या जीवनाबद्दल असमाधान निर्माण होते. माझ्याकडे काय नाही? याकडे लक्ष देण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे, तर माझ्याकडे कोणता आत्मिक वैभव आहे? याचा विचार कमी होत आहे. आज आपण वस्तूंमध्ये आनंद शोधत आहोत. पैसा, पद, प्रतिष्ठा यांच्या मागे धावताना अंतःकरणातील शांतता हरवते. परिणामी, मिळालेल्या गोष्टींचा आनंद घेण्याऐवजी अजून काही मिळवण्याची धडपड सुरूच राहते. अशा परिस्थितीत भगवान महावीरांनी सांगितलेली अपरिग्रहाची (अत्याधिक लोभ टाळणे) शिकवणही महत्त्वाची ठरते. अनेक युद्धांचे कारण संसाधनांवरील ताबा, सत्ता आणि संपत्तीची लालसा हे असते. जर राष्ट्रांनी आणि व्यक्तींनी अपरिग्रहाचा स्वीकार केला, तर लोभ आणि स्पर्धा कमी होऊन शांततेचा मार्ग मोकळा होईल. महावीरांनी इंद्रियांवर मिळवलेला विजय सर्वात मोठा विजय असे संबोधले आहे. एवढेच नव्हे तर त्यांनी आपल्या समवशरणात पुरुषांसह महिलांना स्थान देऊन त्यांना आत्म कल्याण व पर कल्याण कार्यात सहभाग करून घेतले आहे.

धर्म आणि धर्मग्रंथाच्या नावाखाली केल्या जाणाऱ्या कृत्याला विरोध करण्यासाठी भगवान महावीरांनी वैयक्तिक सुखाचा त्याग करून जंगलाचा मार्ग स्विकारला. बारा वर्षे, पाच महिने, पंधरा दिवस तपश्चर्या करून घाती कर्म नाश करून केवल ज्ञान म्हणजे आत्मिक ज्ञान प्राप्त करणाऱ्या महावीरांनी राग, द्वेष, भयमुक्त होऊन काशी, कोशल, पांचाल, कलिंग, कुरुजांगल, कंबोज, वाल्हिक, सिंधु, गांधार सारख्या प्रदेशात मानव रक्षणाचे कार्य केले.

भ्रष्टाचार व कलुषित मन व्यक्ती, समाज व राष्ट्रासाठी घातक आहे. वृत्तपत्रात दररोज भ्रष्टाचाराच्या बातम्या वाचायला मिळतात. अशा परिस्थितीत महावीरांनी दिलेला संदेश प्रासंगिक वाटतो. स्वच्छ मन म्हणजे शांत, सकारात्मक आणि निर्मळ विचारांची अवस्था. मन स्वच्छ असणे अनेक कारणांनी आवश्यक आहे. स्वच्छ मनामुळे आपण विचारपूर्वक आणि योग्य निर्णय घेऊ शकतो. गोंधळलेले मन चुकीचे निर्णय घ्यायला प्रवृत्त करते. डॉक्टर सुद्धा दीर्घायुषी होण्यासाठी शरीर व मन शुद्ध ठेवण्याचा सल्ला देतात. भगवान महावीरांनी सप्त व्यसनांचा त्याग करण्याचा उपाय सांगितला आहे. एड्स सारखा भयंकर रोग पर स्त्री सेवनाने होत असल्याने तत्कालीन समयी त्यांनी पर स्त्री सेवन त्याग करण्याचा सल्ला दिला. पर्यावरण संतुलित करण्यासाठी, जैव विविधतेचा (इळेवर्ळींशीीळीं) विचार करून शिकार त्याग करण्याचा उपदेश दिला. बुडणारी घरे वाचवण्यासाठी जुगार व दारू पासून दूर राहण्यास सांगितले. त्यांनी श्रावक म्हणजेच सामान्य नागरिकांसाठी अष्टमूलगुण पालन व मुनींकरीता अठ्ठावीस मूल गुण पालन करण्याचा उपदेश दिला आहे. महावीरांनी दिलेला संयम आणि आत्म शुद्धीचा मार्ग देखील आजच्या परिस्थितीत आवश्यक आहे. राग, सूड, द्वेष या भावनांमुळे मन कलुषित होते. संयम आणि आत्मनियंत्रणामुळे या नकारात्मक भावनांवर नियंत्रण मिळवता येते आणि शांततेचा मार्ग स्वीकारता येतो. महावीरांचे सत्य, करुणा आणि क्षमा यांचे तत्त्वज्ञान समाजाला नवी दिशा देऊ शकते. क्षमाशीलता आणि करुणा या गुणांमुळे वैर संपवून मैत्रीची भावना निर्माण होते.

**- प्रा. धन्यकुमार जिनपाल बिराजदार,**
**सोलापूर मो. ९४२३३३०७३७**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सरपंचांच्या अधिकारांवर हायकोर्टाचा लगाम

## प्रशासक म्हणून काम करा; पण धोरणात्मक निर्णय नाहीत | मुंबई उच्च न्यायालयाचा स्पष्ट आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मार्च-**

राज्यातील ग्रामपंचायतींच्या कारभारावर दूरगामी परिणाम करणारा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. कार्यकाळ संपलेल्या सरपंचांना प्रशासक म्हणून काम करण्याची मुभा असली, तरी धोरणात्मक व मोठ्या आर्थिक निर्णयांवर स्पष्ट बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे आगामी काळात ग्रामपंचायतींच्या विकासकामांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि अभय मंत्री यांच्या खंडपीठाने हा आदेश देताना स्पष्ट केले की, प्रशासक म्हणून नेमलेले सरपंच केवळ दैनंदिन कामकाजापुरते मर्यादित राहतील. कर्मचारी वेतन देणे, पाणी व वीज बिल भरणे, तसेच अत्यावश्यक सेवांशी संबंधित खर्च यापुरतेच निर्णय घेण्याची त्यांना परवानगी असेल.



मात्र, कोणतेही धोरणात्मक निर्णय, नवीन योजना मंजूर करणे किंवा मोठ्या आर्थिक व्यवहारांना मंजुरी देण्यास त्यांना मनाई राहणार आहे.

राज्य सरकारने २० फेब्रुवारी २०२६ रोजी शासन निर्णय (जीआर) काढून राज्यातील सुमारे १४,५०० ग्रामपंचायतींमध्ये निवडणुका होईपर्यंत किंवा सहा महिन्यांच्या कालावधीसाठी माजी किंवा विद्यमान सरपंचांना प्रशासक म्हणून नियुक्त करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाविरोधात काही याचिकाकर्त्यांनी न्यायालयात आव्हान दिले होते. त्यावर सुनावणी करताना न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. सुनावणी दरम्यान राज्य सरकारने आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, सरपंचांना प्रशासकीय जबाबदारी दिली नाही, तर अनेक ग्रामपंचायती नेतृत्वाविना राहतील. तसेच संपूर्ण पंचायत मंडळावर बंधने आणणे हे संविधानातील कलम २४३ (ई) च्या तरतुदींविरुद्ध जाऊ शकते. मात्र न्यायालयाने युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर सरपंचांच्या अधिकारांवर मर्यादा घालण्याचा निर्णय कायम ठेवला. या निर्णयामुळे कार्यकाळ संपलेले सरपंच प्रशासक म्हणून काम करत असले, तरी त्यांची भूमिका काही प्रमाणात 'नामधारी' राहणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. परिणामी, गावपातळीवरील अनेक महत्त्वाचे निर्णय प्रलंबित राहण्याची शक्यता आहे.विशेषतः नवीन विकासकामे, पायाभूत सुविधा प्रकल्प आणि आर्थिक गुंतवणुकीशी संबंधित प्रस्तावांना विलंब होऊ शकतो. दरम्यान, न्यायालयाने राज्य सरकारला या प्रकरणी प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश देत पुढील सुनावणी ७ एप्रिल रोजी निश्चित केली आहे. त्यामुळे या विषयावर अंतिम भूमिका काय ठरणार, याकडे राज्यभरातील ग्राम पंचायतींचे लक्ष लागले आहे. एकंदर, न्यायालयाच्या या निर्णयामुळे ग्रामपंचायतींच्या प्रशासनात तात्पुरती स्थिरता राखण्याचा प्रयत्न दिसून येत असला, तरी विकासकामांच्या गतीवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# नामसंकीर्तन सभागृहाचे ९० टक्के काम पूर्ण

## येत्या आषाढीला लोकार्पण : परिचारक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० मार्च-**

येथील भव्य 'नामसंकीर्तन सभागृहाचे' (नाट्यगृह) ९० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित १० टक्के काम पूर्ण करण्यासाठी २२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करावा, अशी मागणी माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या मागणीवर मुख्यमंत्र्यांनी अत्यंत सकारात्मकता दर्शवली असून हा निधी लवकरच उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले आहे. दरम्यान हगा निधी मंजूर होताच उर्वरित काम पूर्ण करून येत्या आषाढी वारीमध्ये या नामसंकिर्तन सभागृहाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार असल्याचे देखील प्रशांत परिचारक यांनी सांगितले.



**पंढरपूरच्या सांस्कृतिक वैभवात भर :** वारकरी संप्रदायाचे केंद्र असलेल्या पंढरपुरात हे भव्य सभागृह सांस्कृतिक उपक्रमांसाठी अत्यंत गरजेचे आहे. ९० टक्के काम पूर्ण झाले असून, १० टक्के काम केवळ निधीअभावी रखडले होते. मुख्यमंत्री महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्यामुळे आता या वास्तूचे स्वप्न लवकरच साकार होईल आणि आषाढीला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते याचे लोकार्पण करून ते पंढरपूरकरांच्या सेवेत दाखल होईल, असा विश्वास प्रशांत परिचारक यांनी व्यक्त केला.

२०१८ मध्ये मंजूर झालेल्या या नामसंकीर्तन सभागृह प्रकल्पाचे ९०% काम पूर्ण झाले आहे. मात्र उर्वरित काम ासाठी निधीची आवश्यकता असल्याने परिचारक यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री महोदयांची भेट घेतली. गेल्या २-३ वर्षांपासून नगरविकास विभागाकडे हा विषय प्रलंबित होता. या प्रकल्पाचे महत्त्व लक्षात घेऊन, 'वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत' हा २२ कोटींचा निधी मार्च अखेरपर्यंत मंजूर करावा, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली. मुख्यमंत्र्यांनी या प्रकल्पाबाबत पूर्ण अनुकूलता दर्शवली असून, निधी देण्याबाबत संबंधित विभागाला निर्देश दिले आहेत. निधी मार्चपूर्वी उपलब्ध झाल्यास उर्वरित तिसऱ्या टप्प्यातील नामसंकीर्तन सभागृहाचे अंतर्गत रस्ते, भुखंड विकास अंतर्गत रस्ते सुधारणा, फर्निचर व्यवस्था, विद्युत व्यवस्था, सिसिटीव्ही, सौरऊर्जा कामे व रोहित्र स्थलांतरण इ.कामे करण्याची असून युद्धपातळीवर ती पूर्ण करण्यात येतील असेही परिचारक यांनी सांगितले.



# चैत्र एकादशीनिमित्त भक्ती सत्संग भजन सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० मार्च-**

चैत्री एकादशी निमित्ताने महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक पंडित विश्वनाथ दाशरथे आणि आरती नाडगौडा यांच्या सुरेल आणि श्रवणीय भक्तीगीतांचा सत्संग चंद्रभागेच्या वाळवंटातीरी संपन्न झाला. या कार्यक्रमास वारकरी भाविकांसह, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उजनी येथून संत गणेशनाथ महाराजांची पालखी पंढरपूर क्षेत्री चंद्रभागेच्या तीरी विसावली, तिथं पालखी समोर कीर्तन प्रवचन महाप्रसाद आदी सुंदर कार्यक्रमाबरोबर ख्यातनाम गायक पंडित विश्वनाथ दाशरथे, आरती नाडगौडा यांच्या सुरेल आणि श्रवणीय भक्तीगीतांचा सत्संग चंद्रभागेच्या वाळवंटातीरी संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला वारकरी संप्रदायाचा बीजमंत्र जय जय राम कृष्ण हरी ने सुरुवात झाली.त्यानंतर सुंदर ते ध्यान, अवघे गर्जे पंढरपूर, अबीर गुलाल उधळीत रंग, पद्मनाभा नारायणा, झुलत झुलत, कुणी सांगा कृष्ण देखिला, आम्हां न कळे ज्ञान आदी अभंगरचना बरोबर संत गणनाथांच्याही भावपूर्ण रचना गात शेवटी हेंचि दान देगा देवा या अजरामर संतरचना भैरवीमध्ये गाऊन उपस्थित वारकरी भक्तांना मंत्रमुग्ध केले. यावेळी कार्यक्रमात तितकीच सुंदर साथसंगत तबला पांडुरंग मुखडे, राजगोपाल गोसावी, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे, हार्मोनियम स्वानंद कुलकर्णी तर बासरी देशपांडे यांनी केली.



# श्राविका संकुलात भगवान महावीरांचा जन्मकल्याणक महोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

श्राविका संकुलात अहिंसेचे महान उपासक, जगाला शांतीचा संदेश देणारे, जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर श्री १००८ भगवान महावीर यांचा २६२५ वा जन्मकल्याणक महोत्सव उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सुकुमार मोहोळे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रशालेच्या वरिष्ठ दीप्ती शहा, चतुरबाई प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राखी देशमाने, उमाबाई श्राविका विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री १००८ भगवान महावीर यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून पुष्पांजली अर्पण करण्यात आली. यानंतर प्रशालेच्या वरिष्ठ दीप्ती शहा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. उमाबाई श्राविका विद्यालयातील सहशिक्षिका पल्लवी खांडवे व सोनाली उंडे यांनी जैन ध्वजगीताचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांनी याप्रसंगी जिओ और जीने दो, अहिंसा परमो धर्म की जय, श्री १००८ महावीर भगवान की जय या घोषणांनी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण केले. चतुरबाई विद्यालयातील सहशिक्षिका प्रगती गांधी यांनी यावेळी भगवान महावीर यांच्या जीवन चरित्राचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला.

तत्पूर्वी शाळा परिसरातील श्री १००८ भगवान महावीर मंदिरात सकाळी आठ वाजता भगवंतांचा पंचामृत अभिषेक सानंद संपन्न झाला. तद्नंतर पाळणा सोहळ्यात महिला श्राविका सहभागी होऊन भक्तीरसात न्हाऊन निघाल्या. सूत्रसंचालन सहशिक्षक वृषभ सोनटक्के तर आभार सुहास सुहास छंचुरे यांनी केले. कलाशिक्षक प्रविण कंदले यांनी भगवान महावीरांचे काढलेले चित्र सर्वांचे आकर्षण ठरले.

# रत्नाई कृषी महाविद्यालयात ७१ विद्यार्थ्यांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३० मार्च-**

रत्नाई कृषी महाविद्यालयात चि. सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते-पाटील यांचे वाढदिवसा निमित्त रक्तदान शिबिर आणि आरोग्य तपासणी आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ७१ विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी रक्तदान केले.

आरोग्य शिबिरामध्ये ११४ विद्यार्थ्यांनी आणि २७ प्राध्यापक वृंद, अशा एकूण १४१ जणांनी सहभाग नोंदविला. यामध्ये सीबीसी, सी १९.९, सी १२५, HB1C, BSL या चाचण्यांचा समावेश होता. सध्याच्या धावत्या जगात प्रत्येकाने आरोग्य तपासणी करून घेणे अत्यावश्यक असल्याने या शिबिराचे आयोजन केले असल्याचे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप कांबळे यांनी स्पष्ट केले. रक्तदात्यांना



प्रोत्साहनपर बॅग, साऊंड बॉक्स, हेडफोन यासारख्या भेटवस्तू देण्यात आल्या. यासाठी रेवनील रक्तपेढी, सांगोला यांचे सहकार्य लाभले. शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रा. संदीप कांबळे, प्रा. डी.पी. बरकडे, प्रा. ए. बी.तमनर, सचिन गायकवाड यांनी परिश्रम घेतले. यावेळी प्राचार्य प्रा. रविराज गणेशराव नलावडे, डॉ. वाय.टी.जाधव, आदित्य माने-पाटील, प्रा. सचिन भोसले, डॉ. बी.ए. शिंदे, प्रा.सचिन एकतपुरे, प्रा. डी.एस. मेटकरी आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ संचालक तथा माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, ज्येष्ठ मार्गदर्शक संचालक जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, संस्थेचे अध्यक्ष संग्राम सिंह जयसिंह मोहिते-पाटील, संचालिका स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील, अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

# 'आठवणींच्या हिंदोळ्यावर' पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

सेवासदन प्रशालेच्या निवृत्त मुख्याध्यापिका शीला पत्की यांच्या अनुभव समृद्धीवर आधारित आणि त्यांच्या समर्थ लेखणीतून साकारलेल्या 'आठवणींच्या हिंदोळ्यावर' या पुस्तकाचे प्रकाशन रविवारी झाले. पुस्तकाचा प्रकाशन सोहळा डॉ. सरिता कोठाडिया, निवृत्त प्राध्यापिका, वैशंपायन वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर,यांच्या हस्ते आणि म.सा.प सोलापूर शाखेच्या अध्यक्षा प्रा डॉ. श्रुती वडगबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

विद्यानगर येथील सभागृहात मोकळ्या, आल्हाददायक वातावरणात हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमास अनेक मान्यवर, गणगोत, हितचिंतक उपस्थित होते. गगन सदन तेजोमय या विलास कुलकर्णी यांच्या गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. वंदना कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. मान्यवरांच्या सत्कारानंतर लेखिकेने आपल्या खुमासदार शैलीत मनोगत व्यक्त केले .त्या म्हणाल्या' वाचकांनी मला भरभरून प्रेम दिले. माझे लिखाण हे सातासमुद्रापार पोचले आणि अनेक ठिकाणाहून मला सतत प्रतिक्रिया येत असतात .या वाचकप्रेमाची ही फलश्रुती आहे. निरीक्षणाची शक्ती काय असते हे मी मराठीचे ज्येष्ठ साहित्यिक पु.ल.देशपांडे यांच्याकडून शिकले.

डॉ. सरिता कोठाडिया म्हणाल्या 'हा पुस्तक



प्रकाशनाचा सोहळा म्हणजे वाचकांना आनंद देणारा आहे. तसंच लेखिकेच्या अनुभवांनी वाचकाला प्रकाश देणारा समारंभ आहे. अध्यक्षीय भाषणात डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर म्हणाल्या, शीलाताईंचे लेखन हे सकस दर्जेदार आहे .त्यात शिक्षिकेची तळमळ, मातेचे वात्सल्य, प्रेम व जिव्हाळा आहे. वडिलांची जबाबदारी व शिस्त आहे.विज्ञानाच्या कसोटीवर तासलेले हे साधे, सरळ, सोपे तत्वज्ञान आहे. हे समाजात झिरपले पाहिजे. नकारात्मक वातावरणात आशेचा दिवा म्हणजे आठवणींच्या हिंदोळ्यावर हे पुस्तक आहे. असेच लिखाण शीलाताईंकडून व्हावे हीच ईच्छा. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन बीना जोशी यांनी केले. या कार्यक्रमाचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे वाचकांकडून ऐच्छिक मूल्य घेऊन पुस्तक वितरीत करण्यात आले. जमा रक्कम गरजू विद्यार्थ्यांच्या गणवेश फंडात जमा करण्यात आली.

# संजय सत्रे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ३० मार्च-**

जि.प. प्राथमिक शाळा सांगवी (ता. पंढरपूर) येथील सहशिक्षक संजय महादेव सत्रे यांना पंचायत समिती पंढरपूर यांच्यावतीने आदर्श तालुका शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला. वस्ती शाळां मधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता व पटसंख्या वाढीसाठी त्यांनी केलेल्या शैक्षणिक कामाबद्दल त्यांना जिल्हा परिषद सोलापूर अंतर्गत सहशिक्षक या पदावरती नियुक्ती देण्यात आली. या कार्याबद्दल त्यांना पंचायत समिती पंढरपूर यांच्यावतीने आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला. पेहे केंद्राचे केंद्र अध्यक्ष दशरथ मोरे, गगनगिरी विद्यालय सांगवी विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल रणदिवे, शाळेचे व्यवस्थापन समिती अध्यक्ष कुंडलिक भोसले, उपाध्यक्ष सोम नाथ गलांडे, ग्रामस्थांनी त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले.



## महत्वाचे...



### सोशलच्या दत्ता इंगळे यांची सोलापूर ग्रामीण पोलीस दलात निवड

**सोलापूर, दि. ३० मार्च-**

सोशल असोसिएशन आर्टस अॅण्ड कॉमर्स महाविद्यालयात ९ महाराष्ट्र बटालियन एनसीसी विभागाच्या एनसीसी कॅडेट दत्ता हनुमंत इंगळे यांची सोलापूर ग्रामीण पोलीस दलात निवड झाली. दत्ता इंगळे हे सोशल महाविद्यालयातील एनसीसी विभागमध्ये एक मेहनती व शिस्तप्रिय विद्यार्थी असून त्यांनी एनसीसीच्या माध्यमातून शिस्त, देशसेवा आणि नेतृत्वगुण आत्मसात केले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल ९ महाराष्ट्र बटालियन एनसीसी कमाडिंग ऑफिसर कर्नल रणधीर सतीश, लेफ्टनंट कर्नल शरब बाबर आणि महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. ई. जा. तांबोळी, एनसीसी अधिकारी मेजर डॉ. गौस शेख, प्रा. रईसा शेख, शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.



### किशोर दत्तात्रय घोडके यांचे रक्तदानाचे अर्धशतक

**अकलूज, दि. ३० मार्च-**

समाजसेवेचा खरा अर्थ कृतीतून दाखवणाऱ्या किशोर दत्तात्रय घोडके या रक्तदात्याने ५० वेळा रक्तदान करून एक उल्लेखनीय टप्पा गाठला आहे. स.म.शंकरराव मोहिते पाटील रक्तपेढी, अकलूज येथे भक्ती कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट, अकलूज वतीने आयोजित शिबिरात ५० वे रक्तदान करत किशोर लक्ष्मी दत्तात्रय घोडके या रक्तदात्याने त्यांचा लॉन्ड्रीचा व्यवसाय चालवत सातत्यपूर्ण रक्तदानाच्या योगदानातून अनेकांचे प्राण वाचवण्यास हातभार लावला आहे. शिबिराच्या माध्यमातून उत्कर्ष शिंदे, अक्षय लोंढे, दिग्विजय गायकवाड या तीन तरुणांनी प्रथमच रक्तदान करून समाजासाठी योगदान देण्याची सुरुवात केली. यावेळी भक्ती कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटचे प्राचार्य गजानन जवंजाळ यांनी एका बाजूला किशोर घोडके या अनुभवी रक्तदात्याचा आदर्श तर दुसऱ्या बाजूला तरुण नवोदितांचा उत्साह - या दोन्हींच्या संगमातून रक्तदान चळवळीला नवी ऊर्जा मिळत आहे, असे मत व्यक्त केले. यावेळी सर्व रक्तदात्यांचा तसेच किशोर घोडके यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी साहित्यिक चंद्रशेखर गायकवाड, अशोक साळुंखे, श्रीमंत बर्वे, आकाश मोरे, मंदा घोडके, अक्षय शिंदे, ओम राज कांबळे, गणेश शिर्के, ऋषिकेश काटकर, संदीप बोडरे, ऋषिराज शिंदे, कांतीलाल एकतपुरे यांचे सहकार्य लाभले.



### सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी तेजस्विनी मरोड

**वैराग, दि. ३० मार्च-**

वैराग परिसरातील कार्यकर्त्या तेजस्विनी राजनसिंह मरोड यांची सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीचे अधिकृत पत्र प्रदान करण्यात आले. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार मल्लिकार्जुन खर्गे, खासदार राहुल गांधी, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले (प्रभारी हर्षवर्धन सपकाळ) आणि खासदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष अधिक बळकट करण्यासाठी आपण कार्यरत राहणार असल्याचा विश्वास मरोड यांनी यावेळी व्यक्त केला.



### प्रा. महेश घोटकर यांना गणित विषयात पीएच. डी.

**वैराग, दि. ३० मार्च-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील प्रा. महेश विश्वंभर घोटकर यांनी गणित विषयात पीएच.डी. मिळविल्याबद्दल तामलवाडी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा पेढा भरवून सत्कार करण्यात आला. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत आणि ग्रामीण भागातून शिक्षण घेतलेले प्रा. महेश घोटकर हे पुणे येथील जयवंतराव सावंत अभियांत्रिकी शिक्षण संकुलात कार्यरत असून, त्यांचे पीएच.डी.चे मार्गदर्शक डॉ. रेणू पाठक, संदीप युनिव्हर्सिटी, नाशिक हे होते. पीएच. डी. ही कोणत्याही क्षेत्रातील सर्वोच्च शैक्षणिक पदवी आहे, जी संशोधनावर आधारित असते. सामान्यतः मास्टर डिग्रीनंतर प्रवेश परीक्षा आणि मुलाखतीद्वारे पीएच. डी. करता येते. प्रा. घोटकर यांच्या सत्कार समारंभाच्या वेळी तामलवाडी यात्रा कमिटीचे अध्यक्ष सुनील गायकवाड-पाटील, उपसरपंच सुधीर पाटील, ग्रा. पं. सदस्य यशवंत लोंढे, सुधाकर लोंढे, शाहीर गायकवाड, सिध्देश्वर मसुते, त्रिंबक दिक्षीत, शुभम गायकवाड, गोपाळ पाटील, हरी पाटील, सतीश माळी, नागनाथ मसुते, राम कदम, अमोल माळी उपस्थित होते.

